# तरंग मनाचे, तरंग मनाचे

तरंग मनाचे, तरंग मनाचे ।
भाव धुंद या भाव दोघांचे ॥
हळव्या झुलत्या मुग्ध कळीचे ।
डुलत्या फुलत्या तृप्त फुलांचे ... तरंग या मनाचे

निळ्या नभाच्या निळाईचे ।
हिरव्या धरतीच्या नवलाईचे ॥
चिंकूस कोवळ्या अंकुराचे ... तरंग मनाचे

मातीच्या ओल्या मृद्गंधाचे ।
खळखळणाऱ्या अवखळ झऱ्याचे ॥
सळसळणाऱ्या शुभ्र तुऱ्यांचे ... तरंग मनाचे

फळभारे झुकलेल्या वृक्षांचे ।
स्वच्छंद विहरत्या पक्षांचे ॥
अखंड चिवचिवत्या पाखरांचे ... तरंग मनाचे

मानवी मनाच्या मुक्त स्पंदनाचे ।
सुख दुःखाच्या बेधुंद बंधनाचे ॥
आत्मशोधाच्या शुद्ध जाणिवेचे ... तरंग मनाचे
तरंग मनाचे, तरंग मनाचे

सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर कोथरुड पुणे 38
9405438939